# भारतीय आणि पाश्चात्य ज्ञानमीमांसा

# Indian and Western Epistemology

:: संपादक ::

डॉ शीतल येरुळे

डॉ सुरेंद्र गायधने

डॉ सुनिल साळुंके

अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषद २०२३

Scanned with OKEN Scanner

282

# ज्ञानमीमांसा:
## भारतीय व पाश्चात्य

संपादक:

प्रा.डॉ. शीतल येरूळे

प्रा.डॉ. सुरेन्द्र गायधने

प्रा.डॉ. सुनील साळुंके

अखिल भारतीय तत्वज्ञान परिषद

T.C

Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

Scanned with OKEN Scanner

17.प्लेटोचा ज्ञानशास्त्रीय विचार –डॉ.धनराज हाडुळे 104-112
18. न्याय दर्शनाचे प्रमाणशास्त्र : एक चिंतन – डॉ.दिलीप नागरगोजे 113-119
19.संशोधन आणि ज्ञान – डॉ.चंद्रकांत सोनवणे 120-124
20.जैन दर्शनातील मनःपर्याय ज्ञान –स्मिता गोविंदराव बैतुले 125-130
21.चार्वाकांची ज्ञानमीमांसा –विकास गायकवाड 131-133
22.जॉन लॉक आणि चार्वाक यांचा अनुभववादी ज्ञानसिध्दांतः एक तुलनात्मक अध्ययन –डॉ. उध्दव कांबळे / डॉ. माधव कांबळे 134-138
23.जॉन लॉक –ज्ञानमीमांसा –डॉ. बाळासाहेब मुळीक 139-145
24.प्रमाण मेरू अनुमान –डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र 146-150
25.ज्ञानमीमांसा– न्यायदर्शनाच्या दृष्टीकोनातून –अल्का पद्माकरराव चिखूर्डेकर 151-155
26.भारतीय दर्शनातील ख्यातिवाद संकल्पना –केंद्रे रत्नाकर ज्ञानोबा 156-163
27.सांख्य दर्शनातील ज्ञानसिध्दांत –प्रा.स्वामी सोनु मन्मथ 164-168
28.भारतीय ज्ञानमीमांसेची संकल्पना –शिंदे पूनम सुंदर 169-175
29.पाश्चात्य ज्ञानमीमांसा मध्ये हयूम ची भूमिका –प्रिती नंदकिशोर धुर्वे 176-179
30.जॉनलॉक : ज्ञानमीमांसा –रागिनि शिवलिंग हारके 180-183
31.भारतीय तत्वज्ञानातील प्रत्यक्ष ज्ञान प्रमाण –प्रा.डॉ.गोदावरी भुसारे 184-189
32.न्याय दर्शनातील ज्ञानमीमांसा –डॉ. कुलकर्णी एस. बी. 190-196
33. भारतीय तत्त्वज्ञानातील सत्यत्त्व व मिथ्यात्त्व –प्रा.डॉ.एन.के.रासकर 197-199

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

Lecturer
Shivaji College, Hingoli
Ta & Dist. Hingoli (MS.)

## 1.Yoga as Spiritual Epistemology?

**Dr. Sharmila Virkar**
Dept. of Philosophy
University of Mumbai
sharmila.virkar@philosophy.mu.ac.in

**Preface:**

***A very different form is used, here, for presenting my ideas on the theme.***

***A dialogue is imagined as Q and A (Question and Answer) for elucidating Yoga as Spiritual Epistemology.***

**Q:** Epistemology is the theory of knowledge which discusses problems such as definition of knowledge, sources of knowledge, validity of knowledge, to name a few. Yogasûtras do not deal with these problems. Yoga system basically puts forth the Supreme end of life called Kaivalya and all of Yoga systems centre around this end prescribing various means, practices, do's and don'tsleading to this end. In that case, can we speak of Yoga Epistemology as such?

**A:** I understand your concern. **Yoga systems are not known for their Epistemology.** Their ethico-spiritual contribution is substantial providing transformational dimension significant in Literature,Education, Psychology, Sociology, Commerce, to name a few. You have rightly pointed out that **there are no Epistemological discussions in Yogasûtras.**

**Q:** Yes, there is a single sûtra, specifically, the seventh sûtra in the first chapter mentioning Pratyakca, Anumâna and Âgama i.e. sense-perception, Inference and Testimony and the preceding one stating the word "PramâGa".



Scanned with OKEN Scanner

283

## 24.प्रमाण मेरू अनुमान

–डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र
तत्त्वज्ञान विभाग
शिवाजी महाविद्यालय हिंगोली.

### 1. गोषवारा :

भारतीय तत्त्वज्ञान अभ्यासत असताना असंख्य संज्ञा, संकल्पनाचा अभ्यास केला जातो. जसे धर्म, अर्थ, काम, मोक्ष, पुनर्जन्म, पाप–पुण्य, कर्मसिद्धांत, नीतिशास्त्र, सत्ताशास्त्र, ज्ञानशास्त्र, ईश्वर, अंतिम तत्त्व इत्यादी. नीतीशास्त्र, सत्ताशास्त्र तसेच ज्ञानशास्त्र ह्यातर भारतीय तत्त्वज्ञानाच्या मुख्य शाखा म्हणून ओळखल्या जातात. भारतीय दर्शने आणि तत्त्वचिंतक तत्त्वज्ञानातील असंख्य व्याख्येय, अव्याख्येय संकल्पना अभ्यासत असतात. म्हणजेच विश्वरचना, अव्याख्येय संज्ञा, अनाकलनीय विश्व यासंबंधी जाणून घेण्याची जिज्ञासा प्रत्येकाच्या ठिकाणी कायम निर्माण होते आणि त्याची चिकित्सा, सत्यापर्यंत पोहोचण्याची धडपड म्हणजेच पर्यायाने ज्ञान मिळवणे होय. विश्वाबद्दल जाणून घेणे होय. ही क्रिया माणूस अव्यहातपणे करत आला आहे. पुढेही करत राहणार आहे. मग ते ज्ञान त्याला प्रत्यक्षाच्या माध्यमातून होते तर कधी अप्रत्यक्षाच्या माध्यमातून. मग ज्ञान म्हणजे काय? प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष म्हणजे काय? या सर्व प्रश्नांची चिकित्सा प्रस्तुत शोधनिबंधात केली जाणार आहे.

### 2. संज्ञा :

काही संज्ञा या अव्याख्येय असतात. म्हणजे त्यांची व्याख्या करता येत नाही. पण अनुमानाच्या बाबतीत मात्र तसे नाही. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात असंख्य संज्ञा ह्या अव्याख्येय असतात. उदा. पिवळा म्हणजे पिवळा, चांगले म्हणजे चांगले आणि इतर. पण अनुमानाची मात्र साध्या–सोप्या शब्दात व्याख्या करता येते. उदा. ष्माहितीच्या हजारे माहीती नसलेल्या गोष्टीचे ज्ञान करून घेणे म्हणजे अनुमान होय.ष्म्हणून अनुमान ही संज्ञा अव्याख्येय नाही. हनुमान हा शब्द अनुमान ह्या दोन शब्दापासून बनला आहे. अनु म्हणजे नंतर मान म्हणजे ज्ञान. अशा अनुमान या संज्ञेची चिकित्सा प्रस्तुत शोधिबंधात केली जाणार आहे.

### 3. प्रस्तावना :

भारतीय दर्शनातील प्रमाण विचारांची चिकित्सा करत असताना भारतीय



ज्ञानशास्त्रातील अनुमान संकल्पना अभ्यासणे अगत्याचे ठरते. मानवी ज्ञानासंदर्भात सखोल विचार करत असताना असे लक्षात येते की प्रत्यक्षानंतरचे अतिशय महत्त्वाचे प्रमाण म्हणजे अनुमान प्रमाण होय. ज्ञान म्हणजे काय? प्रत्यक्ष म्हणजे काय? अप्रत्यक्ष म्हणजे काय? ज्ञान प्रमाण म्हणजे काय? प्रमाण किती आणि कोणतं? त्यातील प्रत्यक्षाचे प्रकार किती? अप्रत्यक्षाचे प्रकार किती? अनुमान हे प्रत्यक्ष प्रमाण आहे की अप्रत्यक्ष या सगळ्यांची सविस्तर चिकित्साप्रसू शोध निबंधात करण्यात येणार आहे.

### 4. उद्देश :

1. अप्रत्यक्ष ज्ञानाचे मानवी जीवनातील महत्त्व विशद करणे.
2. ज्ञान प्रक्रियेसंबंधी सविस्तर चर्चा करणे.
3. अनुमान हे ज्ञान प्रक्रियेचे अविभाज्य अंग आहे हे सिद्ध करणे.
4. अनुमानाचे मानवी जीवनातील महत्त्व स्पष्ट करणे.

### 5. विषय विश्लेषण :

भारतीय तत्त्वज्ञानाचा विचार करत असताना प्रामुख्याने भारतीय तत्त्वज्ञानाच्या प्रमुख तीन शाखा ओळखल्या जातात. त्या म्हणजे सत्ताशास्त्र, नितीशास्त्र आणि ज्ञानशास्त्र ह्या होत. सत्ताशास्त्र या तत्त्वज्ञानाच्या शाखेत अंतिमसत्ते संबंधी चर्चा केली जात. या विश्वाच्या बुडाशी आधारभूत तत्व कोणते, किती यासंबंधी चर्चा करण्यात येते. या अफाट अनाकलनीय विश्वाचा अर्थ उलगडण्याचा मानव सातत्याने प्रयत्न करत आला आहे. त्याची विजिगीपू वृत्ती त्याला कधीच निवांत बसू देत नाही त्यामुळे त्याला या विश्वासंबंधी सातत्याने उत्सुकता रहात आली आहे. म्हणून तो या विश्वाचा अर्थ लावण्याचा सातत्याने प्रयत्न करतो. त्यामुळे असंख्य वर्षापासून मानवाची ही जिज्ञासा सतत त्यापाठीमागे धावत राहिली आहे. विश्व आणि विश्वातील अनाकलनीयता यामुळे मानव चिकित्सक बनला. त्याचा हा शोध निरंतरपणे सुरूच राहिला. दुसरी शाखा म्हणजे नीतिशास्त्र होय. जेव्हापासून मानवाने एकत्र राहून समाज निर्मिती केली तेव्हापासून नीतीची निर्मिती झाली. टोळ्या– टोळ्यांनी एकत्र राहताना मानवाला नियमांची, नितीची गरज भासू लागली. त्याच्या गरजेनुसार त्या–त्या काळात त्याने प्रासंगिक नियम सर्वांसाठी वेळेवर तयार केले. ते पुढे–पुढे सर्वांच्या भल्यासाठी, संरक्षणासाठी, यातायात, व्यापार, सोईसाठी तयार केले. ज्यांचे उल्लंघन केले त्यांना बक्षीस किंवा शिक्षा दिली जाऊ लागली. आणि तात्पुरत्या स्वरूपाचा आचार संहिता तयार केली गेली आणि तिथपासून नीतीशास्त्राला सुरुवात झाली.

त्यानंतरची तत्त्वज्ञानाची तिसरी आणि महत्वपूर्ण शाखा म्हणजे ज्ञानशास्त्र

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •
I.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)



Scanned with OKEN Scanner

होय. ज्ञानशास्त्र ही तत्त्वज्ञानाची अतिशय महत्त्वपूर्ण शाखा आहे. ज्ञान म्हणजे काय? ज्ञाता म्हणजे काय? ज्ञय वस्तू म्हणजे काय? ज्ञानाचे सत्यत्व कसे ठरवावे? ज्ञानाची प्रमाणे किती? ज्ञानाची प्रमाणे कोणती? या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तरे ज्ञानशास्त्रात दिली जातात. या संदर्भाने प्रस्तुत शोधनिबंधामध्ये चिकित्सा करण्यात येणार आहे. भारतीय दर्शनामध्ये ज्ञानाची अनेक प्रमाणे मानण्याची पद्धत आहे. त्यापैकी जवळपास सर्वच दर्शनांनी प्रत्यक्ष, अनुमान, शब्द, उपमान, हे चार प्रमाणे मान्य केली आहेत. याशिवाय काही दर्शनांनी काही प्रमाणे कमी तर काही दर्शनांनी काही प्रमाणे कमी केली आहेत. तरीही ढोबळ मानाने ही चार प्रमाणे आहेत. त्या अगोदर ज्ञानाचे प्रकार कोण कोणते हे पाहणे गरजेचे ठरते. ज्ञानाचे प्रकार दोन मानण्यात येतात. प्रत्यक्ष दुसरा अप्रत्यक्ष. प्रत्यक्ष प्रमाणाच्या माध्यमातून होणारे ज्ञान हे सरळ, थेट आणि स्पष्ट स्वरूपाचे असते. त्याला कुठल्याही मध्यस्थाची आवश्यकता नसते. थेट ज्ञानेन्द्रिय आणि ज्ञय वस्तू यांचा संनिष्कर्ष होतो तेव्हा प्रत्यक्ष ज्ञानाची प्राप्ती होते. म्हणून त्या ज्ञानाला प्रत्यक्ष ज्ञान असे म्हणतात.

अप्रत्यक्ष ज्ञानाचे मात्र तसे नसते. अप्रत्यक्ष ज्ञान होण्यासाठी मध्यस्थाची आवश्यकता भासते. हे ज्ञान फक्त इंद्रियांनी होत नाही. ज्ञानाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी सुद्धा अप्रत्यक्षाचा आधार घ्यावा लागतो. अप्रत्यक्ष ज्ञानाची ढोबळ मानाने तीन प्रमाणे सांगितली जातात. 1. अनुमान 2. उपमान 3. शब्द प्रमाणे ही होत. या सर्वच प्रमाणाच्या माध्यमातून होणारे ज्ञान हे अडपड ज्ञानी होणारे असते. मध्यस्थाशिवाय हे ज्ञान होत नाही. यामध्ये सर्वात महत्त्वाचे प्रमाण म्हणजे अनुमान प्रमाण होय. प्रत्यक्ष नंतर ज्ञान प्रक्रियेतील अतिशय महत्त्वाचे प्रमाण म्हणून त्याकडे बघितले जाते. यासंदर्भात आपले विचार व्यक्त करताना डॉ. नारायणशास्त्री द्रविड म्हणतात, प्रत्यक्ष–प्रमाणाने जाणलेल्या गोष्टीही अनुमान–प्रमाणाने जाणण्या–पारखाण्याची आवश्यकता अनेक प्रसंगी जाणवते. या तथ्यांची अनेक ठसठशीत उदाहरणे देता येतील. भूमितीत मांडण्यात येणारी बहुतेक प्रमेये अडाणी माणसालाही पाहताक्षणी सत्य वाटतात व तशी ती असतातही. पण त्यांची सत्यता सिद्ध करणे सोपे नसते.१ अनुमानाचे महत्त्व डॉ. द्रविड यांनी अशा प्रकारचे उद्‌गार काढले आहेत. अनुमान म्हणजे, माहित असलेल्या गोष्टीच्या आधारे माहीत नसलेली गोष्ट माहिती करून घेणे म्हणजे अनुमानष्अशी अनुमानाची एक ढोबळ मानाने व्याख्या केली जाते. प्रत्यक्ष प्रमाणाच्या आधारे इंद्रियजन्य ज्ञानच आपण अनुभवू शकतो. प्रत्यक्ष हे प्रमाण जरी सरळ, थेट व स्पष्ट स्वरूपाचे असले तर प्रत्यक्ष ज्ञान प्रमाणांवर काही मर्यादाही येतात. कारण इंद्रियांच्या काही मर्यादा असतात. म्हणून आपल्याला अवतीभवतीचे सर्व ज्ञान हे केवळ इंद्रियांच्या माध्यमातून होणे केवळ अशक्य असते. तर मग या विश्वाच्या पसाऱ्या यासंबंधीचे ज्ञान तर फक्त ज्ञानेन्द्रियांनीच होणे हे केवळ अशक्य असते. म्हणून आपल्याला अनुमानावर विसंबून रहावे लागते. डॉ. द्रविड एक ठिकाणी म्हणतात की,न्यायालयात कोणत्याही गुन्हेगाराचा गुन्हा प्रत्यक्ष पाहिलेल्याही साक्षीदाराला त्याचे गुन्हा समर्थक वक्तव्य तर्काने म्हणजे आनुमानीक पद्धतीने प्रमाणित करावे लागते. स्वतः न्यायाधीशाने गुन्हा पाहिलेला असला तरी पुराव्या शिवाय त्याची सत्यता त्याला स्वीकारता येत नाही. या उदाहरणावरून स्पष्टपणे दिसून येते की प्रत्यक्ष–प्रमाण साधारणपणे सर्वतोपरी श्रेष्ठ असे प्रमाण समजले जात असले तरी त्याची विश्वसनीयता ठरविण्याचा प्रसंग उद्‌भवल्यास अनुमान–प्रमाणाची कास धरावी लागतेच. अनुमान प्रमाण असे प्रमाण आहे की, ज्याच्या वापराशिवाय आपण व्यवहारात पानही हलवू शकत नाही किंवा जीवनात श्वासही घेऊ शकत नाहीत. असे उद्‌गार अनुमानाचा संबंधी प्रा. माधवी कवी यांनी काढले आहेत. असे हे अनुमान प्रमाण जीवनात पदोपदी आपण वापरत असतो. उदा. समोरील पर्वतावर धूर दिसत असेल तर त्या आधारे असे अनुमान करता येते की समोरील पर्वतावर अग्नी तेवत असला पाहिजे. म्हणजेच धुरावरून अग्नीचे अनुमान लावत असतो. तसेच शितावरून भाताची परीक्षा करीत असतो. म्हणून अनुमान प्रमाण उपयोगात आणत असतो. म्हणून त्या प्रमाणाला प्रमाणंमेश्व असे म्हटले जाते.

भारतीय तत्त्वज्ञानात तसेच काही अर्वाचीन पाश्चात्य तत्वज्ञानात सुद्धा अनुमान प्रमाणाचा वापर केला गेला आहे. ज्ञानाचे प्रत्यक्ष हे एकमेव प्रमाण मानणाऱ्या चर्वाकानी सुद्धा नंतरच्या काळात अनुमान प्रमाण मान्य केले आहे. यावरून हनुमानाचे ज्ञान क्षेत्रातील महत्त्व आपल्या लक्षात येते. जवळजवळ सर्वच भारतीय दर्शन कारानीं अनुमान प्रमाण मान्य केले आहे. अनुमानाचे दोन प्रकार भारतीय दर्शनकारांनी मान्य केले आहेत. ते म्हणजे स्वार्थानुमान व परार्थानुमान हे होत. जे अनुमान स्वतःपुरते केले जाते त्याला स्वार्थानुमान असे म्हटले जाते. तर परार्थानुमान म्हणजे जे अनुमान इतरांसाठी ज्ञान मिळविण्यासाठी केले जाते त्यास परार्थानुमान असे म्हणतात. भारतीय तर्कशास्त्र मनविणाऱ्या न्यायदर्शनानंतर विचार क्रियेच्या सोयीसाठी पंच अवयवी वाक्याची निर्मिती करून ही प्रक्रिया पाथरंया पायरीने समजावून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. अनुमान आणि अनूमिती हे शब्द समान अर्थाने वापरले जात असतात. तरीही त्यांचे अर्थ मात्र वेगवेगळे आपल्याला पाहायला मिळतात. अनुमिती म्हणजे अनुमानाने उत्पन्न होणारे ज्ञान होय. पक्ष, साध्य, हेतू, हे तीन अनुमिती स्वरूप ज्ञानाचे प्रमुख तीन घटक मानले जातात. धुरावरून अग्नीचे अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो. या प्रकारे आपण दैनंदिन व्यवहारात सुद्धा



SHIVAJI COLLEGE • HINGOLI •
T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)
Scanned with OKEN Scanner

सातत्य अनुमान प्रमाणाचा वापर करून स्वरूप आणि अनुमान प्रकार यांचा ज्या अवयव वाक्यांच्या माध्यमातून निर्देश न करत फक्त संकेताक्षरांच्या माध्यमातून सामान्य रूपानेच त्यांचा निर्देश केला जातो. आणि त्या सामान्य स्वरूपाच्या आधारेच सर्व तार्किक विचार प्राप्त होतो. यालाच पाश्चात्य तत्त्वज्ञानात आकारिक तर्कशास्त्र असे म्हटले जाते. हे पाश्चात्य तर्कशास्त्राचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य आहे असे आपल्याला म्हणता येते. भारतीय तर्कशास्त्रात या उनिवा आपल्याला प्रकर्षाने जाणवतात. पाशाची आणि भारतीय तर्कशास्त्रात विचाराच्या आशयापेक्षा विचाराच्या आकाराला महत्त्व दिले जाते त्यामुळे जी उदाहरणे घेतली जातात ती वास्तविक आहेत अशा प्रकारचा गैरसमज सामान्यपणे अभ्यासकांचा होतो. पण विचाराच्या आशयाला कोणत्याही तर्कशास्त्रात महत्व दिले जात नाही. तर त्याचा आकारत लक्षात घेतला जातो. फ्केवळ–वास्तविक अनुमान–प्रक्रियेचा व्यवहारिक विचार करावयाचा असता तर पदोपदी विविध काल्पनिक अशा अनुमानाची चर्चा नैयायीकांनी केलीच नसती. अनुमान–प्रक्रियेच्या प्रत्येक घटकाच्या विचाराच्या संदर्भात त्या–त्या घटकांच्या वरील सारख्या विविध काल्पनिक उदाहरणानाही समोर ठेवूनच त्या–त्या घटकांचे स्वरूप व लक्षणे निर्धारित करण्याचा नैयायीकांनी प्रयत्न केला आहे. ही गोष्ट लक्षात घेतली तर असे म्हणता येईल की पाश्चात्य तर्कशास्त्र जसे वाक्यांच्या आकाराचा विचार करते त्याचप्रमाणे भारतीय तर्कशास्त्र अनुमान–प्रक्रियेच्या घटकांच्या ज्ञाननिमांसीय आकाराचा विचार करते. कोणतेही तर्कशास्त्र आकारिकच असते. भारतीय तर्कशास्त्र या गोष्टीला अपवाद असू शकत नाही.

अशा पद्धतीने भारतीय व पाश्चात्यतत्त्वज्ञानात अनुमान प्रमाणा संबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

**6. निष्कर्ष :**

1. अनुमान प्रमाण हे प्रमाणेवर आहे.
2. अनुमानाशिवाय आपण दैनंदिन जीवनात एक पाऊलही टाकू शकत नाही.
3. प्रत्यक्षा नंतरचे महत्त्वपूर्ण प्रमाण होय.
4. कुठलेही तर्कशास्त्र हे अकारिकच असते.

**7. संदर्भसूची :**


1. भारतीय तत्त्वज्ञानातील प्रमाण मीमांसा, डॉ. नारायण शास्त्री द्रविड.
2. तत्रैव
3. तत्रैव
4. भारतीय तत्त्वज्ञान, डॉ. वेदप्रकाश डोनगावकर.
5. भारतीय ज्ञानमीमांसा, नीलिमा सिन्हा.


T.C


Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)




## 25.ज्ञानमीमांसा– न्यायदर्शनाच्या दृष्टीकोनातून


–अल्का पद्माकरराव चिखूर्डेकर
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय,
लातूर.


अखिल विश्वाचे वास्तव स्वरूप निर्धारित करणे हे तत्त्वज्ञानाचे कार्य आहे. तत्त्वज्ञान किंवा दर्शनांचे मुख्य अभ्यासविषयापैकी 'ज्ञान' ही संकल्पना आहे. भारतीय व पाश्चात्य दर्शनात याचे सविस्तर विवेचन आपणास पाहवयास मिळते. साधारणतः भारतीय दर्शनांची संख्या अनेक आहे. व्याकरण शास्त्रनुसार सुध्दा आपल्या पूर्वजांनी एक दर्शन निर्माण केले, त्याचे प्रयोजन 'निश्रेयस' ठरविले. प्रत्येक भारतीय दर्शन हे प्रथमतः 'निराशावादी' दिसत असले तरीहि अंतिम ध्येय साधताना कोणत्या साधनांचा वापर करुन बध्दजीवाला वासना, ईच्छा किंवा षड्रिपूतून मुक्त होता येईल, याचे मार्ग आस्तिक व नास्तिक दर्शनांनी सांगितले आहेत. जन्मघ्मरणाच्या भवसागरातून मुक्त होण्यासाठी, मोक्ष मिळविण्यासाठी कोणत्या ज्ञानाचा मार्गाचा वापर करावा याचे सविस्तर विवेचन आपल्याला पाहावयास मिळते.

जीवनाचे अंतिम प्राप्तव्य काय? ज्ञान कसे होते, त्यासाठी किती व कोणते प्रमाण मानावयाचे, यातूनच मतभेदास सुरुवात होते. जसे चार्वाकांनी 'प्रत्यक्ष' एकमेव प्रमाण स्विकारले. जैन, बौध्द व वैशेषिक दर्शनांनी प्रत्यक्ष व अनुमान ही दोन प्रमाणे स्विकारली. सांख्य, योग, माध्वाचार्य व विशिष्टाद्वैत हे प्रत्यक्ष, अनुमान व शब्द ही तीन प्रमाणे स्विकारतात. न्याय दर्शनाने उपमान मिळून चार दर्शनाचा स्विकार केला. प्रभाकर यांनी प्रत्यक्ष, अनुमान, शब्द, उपमान व पाचवे अर्थापत्ति हे नविन प्रमाण स्विकारले. अद्वैतवाद व भाट्ट मीमांसकांनी वरील पाचशिवाय अनुपलब्धि हे सहावे प्रमाण स्विकारले.

ज्ञानमीमांसेला इंग्रजीत 'Epistemology' म्हणतात, याचे विवेचन पुढीलप्रमाणे देता येईल.

E – Essence of knowledge (ज्ञानाचे सार)
P – Purpose of knowledge (ज्ञानाचा उद्देश)
I – Integrity of truth and justified belief (सत्य, न्यायपूर्ण)
S – Sources of knowledge (ज्ञानाचा स्त्रोत)
T – Types of knowledge (ज्ञानाचे प्रकार)

T.C

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •



Scanned with OKEN Scanner